निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २७२ * किंमत - २ रु
RNI.No. MAH/MAR2014/56289
* मंगळवार दि.०३ फेब्रुवारी २०२६
* पाने-४

## किनवट पंचायत समिती भ्रष्टाचाराचा अड्डा बनली का?

### कोट्यवधींचा निधी गिळंकृत; दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांना अभयदान, जनतेच्या विकासावर घाला!

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – नांदेड जिल्ह्याच्या टोकावर असलेला आदिवासी व दुर्गम किनवट तालुका विकासाच्या प्रतीक्षेत असतानाच पंचायत समिती किनवट अंतर्गत सुरू असलेल्या योजनांमध्ये उघड उघड गैरकारभार, भ्रष्टाचार व अधिकाऱ्यांची संगनमताने चाललेली लूट उघड होत आहे. शासनाकडून आदिवासी भागाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात असताना, तो निधी प्रत्यक्षात जनतेपर्यंत पोहोचण्याऐवजी कागदोपत्री विकास, बनावट पाहण्या व खोटे अहवाल यांमध्येच गडप होत असल्याचा गंभीर आरोप होत आहे.




तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये रस्ते, नळपाणी योजना, स्वच्छता, अंगणवाडी, आरोग्य व ग्रामविकासाची कामे प्रत्यक्षात न होता केवळ कागदावर पूर्ण दाखवली जात आहेत. काम न करता बिले उचलली जात आहेत, पाहणी न करताच प्रमाणपत्रे दिली जात आहेत, तर या सर्वांवर नियंत्रण ठेवणारे गटविकास अधिकारी व संबंधित विभागप्रमुख मुद्दाम डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. परिणामी ठेकेदार, सरपंच व काही कर्मचारी खुलेआम शासनाचा निधी लुटत असून, सर्वसामान्य नागरिक मात्र मूलभूत सुविधांपासून वंचित राहत आहेत.

अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, या गैरकारभाराबाबत तक्रारी करूनही आजपर्यंत कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्यावर ठोस कारवाई झालेली नाही. चौकशी समित्या कागदावरच राहतात, अहवाल दाबले जातात आणि दोषींना अभयदान दिले जाते. ही प्रशासकीय निष्क्रियता की जाणीवपूर्वक दिलेले संरक्षण? असा संतप्त सवाल आता तालुक्यातील नागरिक विचारत आहेत.

या भ्रष्टाचाराचा थेट फटका आदिवासी, गरीब व शेतकरी वर्गाला बसत असून, शासनाच्या ''विकासाच्या'' घोषणा केवळ पोस्टर व फाईलपुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत. पंचायत समितीचा कारभार हा जनतेसाठी नसून, निवडक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी चालतोय का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जर तात्काळ स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबन, बदली व फौजदारी कारवाई करण्यात आली नाही, तर जनतेचा उद्रेक अटळ असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते व नागरिक देत आहेत.

आता प्रश्न स्पष्ट आहे किनवट पंचायत समितीतील भ्रष्टाचारावर शासनाचा हातोडा कधी बसणार? दोषी अधिकारी-कर्मचारी कधी गजाआड जाणार? की हा आदिवासी तालुका कायमच लुटीचे कुरण राहणार? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास मोठा जनआंदोलन उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही; अश्वारूढ पुतळा शिवजयंतीपूर्वी उभाराच, संभाजी ब्रिगेड व संघर्ष समितीचा स्फोटक इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याच्या मागणीला गेली अनेक वर्षे केराची टोपली दाखवली जात असून, ही दिरंगाई म्हणजे थेट शिवरायांचा अपमान असल्याचा संतप्त आरोप करत शिवजयंतीपूर्वी अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा स्फोटक इशारा संभाजी ब्रिगेड व संघर्ष समिती किनवट यांनी दिला आहे.



किनवट शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शिवाजी चौकात भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याबाबत ठराव मंजूर होऊनही प्रशासन, नगरपरिषद व लोकप्रतिनिधी यांच्या उदासीनतेमुळे प्रत्यक्षात आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. यामुळे शिवप्रेमी, युवक आणि नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

संघर्ष समितीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नसून ते महाराष्ट्राचा आत्मा, स्वाभिमान आणि प्रेरणास्थान आहेत. त्यांचा पुतळा वर्षानुवर्षे रखडवणे ही गंभीर बाब असून, ही बाब केवळ निष्काळजीपणाची नाही तर जाणीवपूर्वक केलेली दिरंगाई आहे. प्रशासनाने वारंवार आश्वासने दिली, बैठकांचा देखावा केला, मात्र प्रत्यक्ष काम मात्र कधीच सुरू झाले नाही, हा जनतेचा विश्वासघात असल्याचा आरोपही करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर येत्या शिवजयंतीपूर्वी पुतळा उभारणीसंदर्भात ठोस निर्णय घेऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नाही, तर किनवट शहरात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल. या आंदोलनात हजारो शिवप्रेमी सहभागी होतील आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा थेट इशाराही देण्यात आला. या घोषणेनंतर किनवट शहरात वातावरण चांगलेच तापले असून, विविध सामाजिक संघटना, युवक मंडळे आणि नागरिकांनी संघर्ष समितीच्या भूमिकेला जाहीर पाठिंबा दिला आहे. आता प्रशासन शिवजयंतीपूर्वी निर्णय घेऊन शिवप्रेमींचा रोष शांत करणार की आंदोलनाला आमंत्रण देणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत नांदेड येथे तीन दिवसीय प्रदर्शन व विक्री कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड** – एमएसएमई विकास कार्यालय छत्रपती संभाजीनगर व खादी ग्रामोद्योग मंडळ नांदेड यांच्यावतीने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत प्रदर्शनी व विक्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्रदर्शनी ४ ते ६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान लोकमान्य मंगल कार्यालय अण्णाभाऊ साठे चौक, सम्राट नगर नांदेड येथे होणार असून दररोज सकाळी ११ ते सायं. ७ या वेळेत सर्वांसाठी खुली राहणार.

या प्रदर्शनीत पारंपरिक कारागीर व शिल्पकारांनी आपल्या वस्तु आणि कौशल्याचे प्रदर्शन व थेट विक्री करण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये सुतार, अस्त्रनिर्माते, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई, झाडू बनवणारे पारंपरिक बाहुली व खेळणी निर्माते, मालाकार या सर्वांना सुवर्ण संधी मिळाली आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते ४ फेब्रुवारीला सायं. ४ वा. होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, , महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, कौशल्य विकास विभाग नांदेड उपस्थित राहणार आहेत. सर्व नागरिकांनी या प्रदर्शनीला भेट देऊन बंधु आणि बहिणींच्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे. अधिक माहिती व स्टॉल बुकिंगसाठी दूरध्वनी क्रमांक ८६००८४२६०१, ९५९९६३२१८६, ८२९८६३२१४५ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## भाग्यनगर साहित्य सेवा संगमचा २३ वा स्थापना दिवस उत्साहात; डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वाटचाल आवश्यक गजानन बिडकर यांचे प्रतिपादन

**आत्ताच एक्सप्रेस**

नांदेड – भाग्यनगर सरस्वती साहित्य सेवा संगमचा २३ वा स्थापना दिवस उत्साहपूर्ण वातावरणात आणि हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर सरस्वती वंदना सादर करण्यात आली.

या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून श्री रोहित चेबरोलु, श्री गजानन बिडकर, झारखंड एकता मंचचे श्री जयंत शर्मा व श्री राजू देशपांडे यांची विशेष उपस्थिती लाभली. संस्थेचे अध्यक्ष श्री उदयकुमार नाईक यांनी संस्थेच्या २३ वर्षांच्या कार्यकाळाचा आढावा घेत विविध साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली. सचिवांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावीपणे पार पाडले.

प्रमुख पाहुणे श्री गजानन बिडकर यांनी संस्थेचे यशस्वी वाटचालीबद्दल अभिनंदन करत 'पत्रकारिता व आव्हाने' या विषयावर विचार मांडले. 'भाषा सेतू' या त्रैमासिकाला डिजिटल प्लॅटफॉर्मवर नेण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. संस्थेची स्वतंत्र वेबसाईट तयार करून साहित्यिक विचार जगभर पोहोचवावेत तसेच युवा पिढीला संस्थेशी जोडून त्यांच्या कल्पनांना वाव द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. आपल्याला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी अध्यक्ष व संपूर्ण टीमचे आभार मानले.

यानंतर श्री जयंत शर्मा यांनी समाजात एकता व संघटन शक्ती वाढविण्याचे महत्त्व स्पष्ट केले. श्री राजू देशपांडे यांनी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा स्थानिक स्तरावर सन्मान केल्यास इतरांना प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन केले.




यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'भाषा सेतू' त्रैमासिकाच्या चालू अंकाचे प्रकाशन करण्यात आले. अंकाच्या संपादकीय, रचना व पृष्ठ मांडणीबद्दल प्रधान संपादक व संपादक मंडळाचे विशेष कौतुक करण्यात आले. संस्थेच्या ज्येष्ठ सदस्या लता संधी मॅडम यांनी यूजीसीवर आधारित आधुनिक कविता सादर केली.

कोंडे सर प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांनी संदेश पाठवून अल्पोपहाराची व्यवस्था केली. कार्यक्रमाचा समारोप श्री मिलिंद पाठक यांनी केला. संस्थेचे कार्य व त्रैमासिक डिजिटल माध्यमातून पुढे नेण्यासाठी संस्था सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तुम्मा जनार्दन, चंद्रकांत जामवाले, तसेच पी. नारायणा, मानसी पाठक, अंकिता पाठक, अर्चना जोशी, गिरीश बिडकर, गौरव बिडकर, माधुरी बिडकर, प्रतीक पाठक आदींचा उत्स्फूर्त सहभाग व प्रतिसाद लाभला.

## किनवट बाजार समितीत शेतकऱ्यांसाठी हक्काचे भवन; १.५२ कोटींच्या निधीस शासनाची हिरवी झेंडी

### आमदार भीमराव केराम यांच्या ठाम पाठपुराव्याचे फलित

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी उभारण्यात येणाऱ्या शेतकरी भवनास महाराष्ट्र शासनाने १ कोटी ५२ लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी दिली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शेतकऱ्यांची ही मागणी अखेर पूर्णत्वास जात असून, या यशामागे आमदार भीमराव केराम यांचा सातत्यपूर्ण व ठाम पाठपुरावा निर्णायक ठरला आहे.

किनवट व परिसरातील शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीत दाखल होत असताना त्यांना निवास, स्वच्छतागृह, विश्रांती व पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत होता. विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना रात्री मुक्कामासाठी अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन आमदार भीमराव केराम यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकरी भवनाचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. मंजूर निधीतून उभारण्यात येणाऱ्या या शेतकरी भवनामध्ये शेतकऱ्यांसाठी राहण्याची सोय, स्वच्छतागृहे, विश्रांती कक्ष, पिण्याच्या पाण्याची व वीजेची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामुळे बाजार समितीतील व्यवहार अधिक सुलभ होऊन शेतकऱ्यांना सुरक्षित आणि सन्मानजनक सुविधा मिळणार आहेत.




या निर्णयामुळे किनवट तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असून, आमदार भीमराव केराम यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. शेतकरी हितासाठी सातत्याने आवाज उठवणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची प्रतिमा अधिक बळकट झाली आहे. शेतकरी भवनाच्या उभारणीमुळे किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकासाला गती मिळणार असून, शेतकऱ्यांसाठी सुविधा केंद्रित विकासाची नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## चर्चेत नव्हते, त्यांना बैठकीबद्दल काय माहिती असणार?

### फडणवीसांचा दावा फेटाळत शरद पवारांचा सवाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार का, यावरून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला. त्याआधी १७ जानेवारीला शरद पवार आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत जयंत पाटील यांच्या निवासस्थानी दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणासंदर्भात बैठक झाल्याचा दावा शरद पवार गटातील नेत्यांकडून सातत्याने केला जात आहे. या दाव्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे नकार दिला होता.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले होते की, दोन्ही राष्ट्रवादी विलीन होणार असत्या तर अजित पवार यांनी त्यांना याबाबत सांगितले असते. ते माझ्याशी सर्व गोष्टी शेअर करायचे, असा त्यांचा दावा होता. मात्र, या वक्तव्यानंतर शरद पवार यांनी पत्रकारांशी झालेल्या अनौपचारिक चर्चेत या विषयावर ठोस प्रतिक्रिया दिली. त्यांच्या विधानामुळे या चर्चेला पुन्हा वेग आला आहे.

शरद पवार यांनी प्रतिप्रश्न उपस्थित करत म्हटले, विलीनीकरणाच्या चर्चेत जे उपस्थित नव्हते, त्यांना बैठकीबद्दल काय माहिती असणार? या एका वाक्याने त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दाव्यावर अप्रत्यक्षपणे सवाल उपस्थित केला. अजितदादा गटातील काही नेत्यांकडून मागील दोन दिवसांपासून अशा कोणत्याही चर्चा झाल्याचे नाकारले जात असताना पवारांचे हे विधान विशेष लक्षवेधी ठरले आहे.

या घडामोडींमुळे शरद पवार विरुद्ध देवेंद्र फडणवीस असा नवा राजकीय वाद उभा राहण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अजित पवारांच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत दोन्ही राष्ट्रवादींच्या भवितव्याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. जयंत पाटील यांच्या घरी बैठक झाल्याचा दावा एकीकडे, तर त्याचे खंडन दुसरीकडे, अशा विरोधाभासी भूमिकांमुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अजितदादा गटातील नेते विलीनीकरणाच्या चर्चांना नकार देत असताना शरद पवारांनी सूचकपणे बैठकीचा उल्लेख केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप आणि अजितदादा गटाचे नेते काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पवारांच्या विधानामुळे या चर्चेला नवे परिमाण मिळाले आहे.

दरम्यान, शरद पवार हे मंगळवारी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सहभागी होण्यासाठी दिल्लीला जाणार आहेत. दोन दिवस संसदीय कामकाजात सहभाग घेतल्यानंतर ते पुन्हा बारामतीकडे रवाना होणार आहेत. त्यांच्या या दौऱ्याकडेही राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. येणाऱ्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेससंदर्भात महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विलीनीकरणाच्या चर्चांवरून सुरू झालेला हा वाद पुढे कोणत्या दिशेने वळतो, आणि त्याचा राज्याच्या राजकारणावर काय परिणाम होतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. शरद पवारांच्या वक्तव्याने या विषयावर पुन्हा प्रकाशझोत पडला असून राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

## माजी लष्करप्रमुख नरवणे आत्मचरित्र प्रकाशित करण्यासाठी कोर्टात का नाही जात?, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा प्रश्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – माजी लष्कर प्रमुख नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातल्या एका उल्लेखावरुन लोकसभेत जोरदार गदारोळ पाहण्यास मिळाला. लोकभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतीच्या अभिभाषणाच्या धन्यवाद प्रस्तावावर बोलत असताना नरवणे यांच्या पुस्तकाचा उल्लेख केला आणि राहुल गांधी म्हणाले की नरवणे यांच्या पुस्तकात उल्लेख आहे की डोकलाममध्ये आणि भारतीय सीमेमध्ये चीनने घुसखोरी केली आहे. मात्र नरवणे यांच्या पुस्तकाचा उल्लेख करताच लोकसभेत हंगामा पाहण्यास मिळाला.

माजी लष्कर प्रमुख मनोज नरवणे यांचं आत्मचरित्र प्रकाशित होत नसेल तर त्यामागे तसंच काही कारण असेल. जर योग्य कारणाशिवाय आत्मचरित्र प्रकाशित करण्यास कोणी अटकाव करत असेल तर नरवणे कोर्टाचा आदेश आणून पुस्तक प्रकाशित करू शकतात. त्यांनी तसे का नाही केले असा प्रश्न संरक्षणमंत्री राजनाथ सिंहांनी लोकसभेत विचारला आहे. एवढंच नाही तर जे पुस्तक प्रकाशित झालेलंच नाही त्या पुस्तकाचा उल्लेख कसा काय केला जातो आहे? राहुल गांधी यांचं वर्तन हे नियमबाह्य आहे असंही राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राजकीय वातावरण तापलं आहे. विरोधी पक्षाने अर्थसंकल्प निराशाजनक आहे अशी टीका केली. त्यानंतर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा सुरु झाली. राहुल गांधी बोलायला उभे राहिले तेव्हा त्यांनी नरवणेंच्या पुस्तकाचा उल्लेख केला. त्यानंतर जोरदार हंगामा पाहण्यास मिळाला. राहुल गांधी म्हणाले मी या पुस्तकाचा उल्लेख करणार नव्हतो पण आमच्या खासदारांच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं त्यामुळे मी हा उल्लेख केला. आर्मीचे निवृत्त प्रमुख नरवणे यांच्या पुस्तकाचा उल्लेख केला. त्यानंतर माझ्या हातात एक मॅगझीन आहे, त्या मॅगझीनमध्ये लेख आहे तो मी कोट करु इच्छितो असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. तसंच मोदी सरकार घाबरत नसेल तर मला बोलू का दिलं जात नाही? असा प्रश्न राहुल गांधींनी विचारला. दरम्यान संरक्षण मंत्री राजनथ सिंह यांनी विरोधी पक्षनेत्यांनी नियमबाह्य वर्तन करु नये असं म्हटलं आहे. ओम बिर्ला यांनीही राहुल गांधी यांना जे पुस्तक प्रकाशितच झालं नाही त्याचा उल्लेख करु नका आणि आपल्या लोकसभेच्या सभागृहाची मर्यादा पाळा असंही ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीत राजकीय डावपेच

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी पुन्हा एकदा ग्रामीण भागात रंगू लागली आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर होत असलेल्या या निवडणुकीत आजी-माजी सदस्य, माजी सभापती आणि दिग्गज नेते पुन्हा मैदानात उतरल्याने राजकीय तापमान वाढले आहे. भाजप-राष्ट्रवादी आमनेसामने, बंडखोरीची शक्यता, नवी युती-आघाड्यांची गणिते आणि घराणेशाहीचा मुद्दा यामुळे ही निवडणूक केवळ सत्तेपुरती न राहता प्रतिष्ठेची लढत ठरत आहे. ग्रामीण विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांवर कोणाचा झेंडा फडकणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मिनी मंत्रालय अशी ओळख असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीची पडघम वाजू लागली असून, आजी माजी जिल्हा परिषद सदस्यांनी दंड थोपटले आहेत. अनेक दिग्गज निवडणूक रिंगणात उतरल्याने पुन्हा एकदा ग्रामीण भागात निवडणुकीचा ज्वर शिगेला पोहोचला आहे. अनुभवी चेहऱ्यांसह काही नव्या समीकरणांमुळे जिह्यातील निवडणूक अधिक रंगतदार होणार आहेत. तब्बल नऊ वर्षांनी निवडणूक होत असल्याने या निवडणुकीला रंगत येणार आहे. महापालिका निवडणुकांप्रमाणे अनेक लढती चुरशीच्या होणार आहेत. या निवडणुकीत अनेक माजी सदस्यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. यामध्ये काही माजी सभापती व पदाधिकारी यांनी विविध गटातून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अनुभवी माजी सदस्यांची मोठी फौज पुन्हा मैदानात उतरल्याने यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत चुरशीच्या आणि प्रतिष्ठेच्या लढती पाहायला मिळणार आहेत. भाजपने महापालिकेत एकहाती सत्ता मिळवली आहे. आता जिह्याच्या राजकारणातही भाजप, राष्ट्रवादी, काँग्रेस आमने-सामने येणार आहेत. या निवडणुकीत देखील अजित पवार यांना शह देण्याची रणनीती भाजपने आखली असल्याचे समजत आहे. पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचा झंझावात रोखण्यासाठी अजित पवारांनी जरी कंबर कसली तरी भाजपकडून अजित पवार यांना धक्क्यांवर धक्के देण्यात येत आहेत. दौंडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दौंडचे आमदार राहुल कुल यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केला. तसेच अजित पवारांना घेरण्यासाठी भाजपने मास्टर प्लॅन तयार केला आहे. पुणे जिह्यात जिल्हा परिषदेच्या कारभाराची गोपनीय चौकशी सुरू केली असल्याचेही बोलले जात आहे. दोन्ही राष्ट्रवादी पक्ष बहुतांश ठिकाणी एकत्र लढत असले तरी पक्षातील बंडोबांचे आव्हान असणार आहेच. या बंडखोरांना शांत करण्यासाठी अजित पवार स्वत: फोन करत आहेत. पक्षाच्या एकजुटीसाठी आणि विजयासाठी बंड मागे घ्यायला सांगत आहेत. इंदापूरच्या राजकारणातील महत्त्वाचे नाव म्हणजे हर्षवर्धन पाटील. त्यांनी अनेक वेगवेगळे डाव टाकूनही त्यांच्या पदरी निराशा आली. त्यांनी आता आपले राजकीय विरोधक राहिलेल्या राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी हातमिळवणी केली. यानंतर ते मोठा निर्णय घेणार असल्याचेही संकेतही दिले आहेत. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवणार असल्याने पाटील-भरणे यांच्या हातमिळवणीमुळे इंदापूरच्या राजकारणात नवीन ट्विस्ट निर्माण झाला आहे. हर्षवर्धन पाटील आणि भरणेंनी आपले विरोधाचे राजकारण आता विकासाच्या वळणावर आणल्याचे पाहायला मिळत आहे. महायुतीत असल्याने नव्या राजकीय वाटचालीचे संकेत नाहीत ना, अशी चर्चाही इंदापूरच्या राजकारणात सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, हे दोघांचे एकत्र येणे सत्तेसाठीचे गणित दिसले तर ते नाकारू शकतात. महाराष्ट्र हिरवा करण्याची कोणाचीही हिंमत नाही घराणेशाहीचा मुद्दाही मतदारांसमोर येईल. अंकिता आणि श्रीराज हे पुढच्या पिढीला संधी म्हणून सादर केले जात असले तरी नेपोटिझमचा ठप्पा बसू शकतो. या युतीमुळे निर्माण झालेल्या असंतोषाचा फायदा घेण्याची आता प्रवीण माने आणि प्रदीप गारटकर यांच्याकडे संधी आहे. राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याला थेट आव्हान देत आहेत. नाराज झालेले लोक माने, गारटकर जोडीकडे वळू शकतात. हे अवघड असले तरी अशक्य नाही. व्यापकपणे प्रभाव टाकण्याठी त्यांना आणखी मेहनत, नवे गट जोडणे आणि घराणेशाहीविरोधी मुद्दा प्रभावीपणे मांडणे गरजेचे आहे. हर्षवर्धन पाटील आणि ठाकरे ही दोन्ही राजकीय घराणी असल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची झाली आहे यात शंका नाही. संग्राम थोपटे यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या पत्नी या भोरमधून पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या आहेत. संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती. मात्र, आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीची सत्ता आली आहे. शिरुरमध्ये अजित पवार पक्षाचे माजी आमदार पोपटराव गावडे यांचे चिरंजीव आणि बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र गावडे यांनी भाजपमध्ये प्रवेश करून जिल्हा परिषदेसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या नातलगांच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या ग्रामीण विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील जनतेच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असलेले प्रशासन या संस्थांमार्फत चालते. लोकसहभाग, पारदर्शकता आणि कार्यक्षम नियोजन यांच्या माध्यमातून या संस्थांना अधिक सक्षम करता येईल. ग्रामीण भारताच्या प्रगतीसाठी आणि समतोल विकासासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची भूमिका भविष्यातही अत्यंत महत्त्वाची राहणार आहे.

## भरत गीते मराठी उद्योजकांचा अभिमान

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- ''जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) गेल्या वर्षी करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराची 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे उद्योजक भरत गीते यांनी अवघ्या एका वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे. वर्षभरात उद्योग उभारणी करणाऱ्या गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा मला अभिमान वाटतो,'' असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

दावोस येथे सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत देवेंद्र फडणवीस आणि भरत गीते यांच्यातील संवादावेळी ते बोलत होते. या भेटीदरम्यान उद्योग उभारणीतील नियोजन, वेगवान अंमलबजावणी, प्रशासन आणि उद्योजकांमधील समन्वय तसेच उत्पादन क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील वाढते महत्त्व यावर सविस्तर चर्चा झाली. 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' आणि 'व्होकल फॉर लोकल' या केंद्र सरकारच्या उपक्रमांना बळ देणाऱ्या या उपक्रमांतून कमी कालावधीत उद्योग उभारणी शक्य असल्याचा प्रेरणादायी संदेश देशभरातील उद्योजकांना मिळाला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी येथे उभारण्यात आलेल्या 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक ॲल्युमिनियम कास्टिंग्ज उत्पादन प्रकल्पाने अल्पावधीतच उत्पादन सुरू करत राज्यासमोर आदर्श औद्योगिक मॉडेल उभे केले आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, स्थानिक औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे.''

# राजकारणापलीकडचे दादा



महाराष्ट्राच्या राजकारणावर वेगळा ठसा उमटवणारा नेता अशी अजितदादांची ओळख होती. मोठ्या झाडाखाली छोटी झाडे तगत नाहीत; परंतु अजितदादा त्याला अपवाद होते. राज्याच्या प्रश्नांची खडानखडा माहिती आणि दूरदृष्टीने निर्णय घेणारा झुंजार नेता म्हणून त्यांची ओळख होती. विमान अपघातात त्यांचा दुर्दैवी अंत झाला. मुख्यमंत्री व्हायचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाले नाही, ही रूखरूख महाराष्ट्राला राहील.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राजकीय वारसा लाभला असला, तरी ते त्या माध्यमातून राजकारणात आले नाहीत. राजकारणी अजितदादा सर्वांना माहीत आहेत; परंतु त्या पलीकडचे अजितदादा अनेकांना माहीत नाहीत. नगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरामध्ये त्यांचा जन्म झाला. अण्णा पाटील कदम हे त्यांचे मामा. दादा राजकारणात कुठेही असले, तरी त्यांनी नातेसंबंध कटाक्षाने जपले. नगर जिल्ह्यात आले, की ते आजोळी जायचे. वेळात वेळ काढून त्यांना भेटायचे. विचारपूस करायचे. विरोधी पक्षात असले, तरी अजितदादांनी राजकारण आणि नातेसंबंध वेगळे ठेवले. अन्य कुणाशी नातेसंबंध असले, तरी त्यांच्याही भेटी अजितदादा घेत. अजितदादा राजकारण्यापेक्षा माणूस म्हणून मोठे होते. अगदी अलीकडचे उदाहरण म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीकडे पाहता येईल. प्रचारासाठी जात असताना त्यांनी एक अपघात पाहिला तेव्हा तिथे थांबून अपघातातील जखमीला तातडीने रुग्णालयात पाठवले. हे अपवादात्मक उदाहरण नाही. नगर जिल्ह्यात एका अपघातातील जखमीसाठी स्वतःची गाडी थांबवली. त्या गाडीतच रुग्णाला दवाखान्यात पाठवून उपचाराची व्यवस्था केली आणि दादा दुसऱ्याच्या गाडीत पुढे निघून गेले. दादा असे माणुसकी जपणारे होते.

दादा उपमुख्यमंत्रीपदी असताना वाढदिवसादिवशी त्यांच्या मुंबईच्या बंगल्यावर जाण्याचा योग आला. सकाळी साडेसहा वाजता तिथे पोहोचलो, तर दादा एका बैठकीत होते. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आमच्यासोबत विदर्भातील काही कार्यकर्तेही आले होते. त्यांची काही सार्वजनिक कामे होती. दादांनी त्यांच्या आमदाराकडून ती जाणून घेतली आणि आमदारालाच खडसावले. या लोकांना घेऊन इतक्या लांब येण्याची काय गरज होती, त्यांना किती त्रास झाला. त्यांची कामे तिथेच व्हायला हवी होती. त्यानंतर त्यांनी या कार्यकर्त्यांची आस्थेने चौकशी केली. त्यांना नाष्टा दिला. ते कसे आले, याची माहिती घेतली. पैसे आहेत का, हे विचारले. आलाच आहात, तर आता मुंबई पाहा आणि गावी जाईपर्यंत तुमचे काम झालेले असेल, असा शब्द दिला. आमदाराला बोलावून संबंधित कार्यकर्त्यांचा खर्च तुम्ही करा, असे बजावले. पैसे नसल्यास माझ्याकडून घ्या, असे सांगायला ते विसरले नाहीत. हे कार्यकर्ते मुंबईहून विदर्भात पोहोचण्याअगोदरच काम झाले होते. पवार कुटुंबाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेळ चोख पाळणे. अजितदादा त्या परंपरेत बसणारे. अजितदादा दिलेल्या सभांना वेळेवर उपस्थित राहत. अजितदादा स्पष्टवक्ते होते. काम होणार असेल, तरच 'हो' म्हणत. होणार नसेल तर तसे स्पष्ट सांगणार. नियमात बसत असेल, तरच काम करणार. नसेल होत तर तसे सांगणार. राजकारणी नेत्यांमध्ये अपवादाने आढळणारा हा गुण अजितदादांकडे होता.

आज त्यांची आठवण काढताना अनेक वर्षे मागे जायला होते. कोल्हापूर येथून शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर अजितदादांनी काटेवाडीमध्ये शेती करायला सुरुवात केली. प्रारंभी त्यांनी टोमॅटोची लागवड केली. टोमॅटोचे हे पीक पाहण्यासाठी दुरून शेतकरी येत असत. त्यानंतर दादांनी शेती क्षेत्रात विविध प्रयोग केले. दुधाचा व्यवसाय केला. जनावरांची खरेदी केली. त्या वेळी ते जनावरांसाठी बाजारातून स्वतः कडबा खरेदी करत. याशिवाय त्यांनी कुक्कुटपालन व्यवसायही केला. हे सगळे उद्योग करताना सगळी कामे ते स्वतः करत. दादांनी काटेवाडी ते कन्हेरी परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले. लोकांना मदत करण्याची त्यांची भूमिका आधीपासूनच पाहायला मिळालेली. लोकांनी मांडलेले प्रश्न, अडीअडचणी घेऊन ते शरद पवार यांच्याकडे जात. तिथे प्रश्न मार्गी लावत असत. अशा पद्धतीने समाजकारण करता करता अजितदादा राजकारणाच्या वाटेवर येऊन उभे राहिले. वेगवेगळी खाती सांभाळताना अजितदादांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले. दादांचा राजकारणापर्यंतचा प्रवास एक प्रगतशील शेतकरी, लघुउद्योजक, संचालक, अध्यक्ष, उपमंत्री, मंत्री आणि उपमुख्यमंत्री असा टप्याटप्याने झाला. प्रत्येक पदावर उत्तम काम केल्यामुळे त्यांना पुढची संधी मिळत गेली. प्रत्येक पदाची जबाबदारी सांभाळताना दादांनी त्यांची योग्यता, गुणवत्ता सिद्ध केली. म्हणूनच वारसा म्हणून दादा राजकारणात आले किंवा त्यांना पदं मिळाली असे अजिबात झाले नाही.

अजितदादा आणि कार्यकर्ते हे समीकरण महाराष्ट्राला नव्याने सांगायची गरज नाही. एखादा कार्यकर्ता दादांशी जोडला गेला, तर मग जीव गेला तर बेहत्तर; पण दादांसाठी वाट्टेल ते करण्याची कार्यकर्त्यांची तयारी असे. कार्यकर्त्यांची कानउघाडणी करताना दादांचा उद्देश कधीच चुकीचा नसायचा. लोकांची कामे व्हावीत, पक्ष पुढे जावा हेच दादांना अभिप्रेत असायचे. दादा अहोरात्र काम करून जनतेच्या प्रश्नांना महत्त्व देत. कार्यकर्त्यांची पदावरून भांडणे दादांना पटायची नाहीत. म्हणूनच ते थोडा कठोर पवित्रा घेऊन कार्यकर्त्यांना तंबी देत. दादांच्या चिडण्यामागे लोकांची विधायक कामे पूर्ण होण्यासाठीची तळमळ असते, हे कार्यकर्त्यांना चांगलेच ठाऊक असायचे. अजितदादांनी जलसंपदा मंत्री या पदाची धुरा सांभाळताना, कार्यभार पाहताना महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा अत्यंत बारकाईने आणि गांभीर्याने अभ्यास केला होता. यातून भूगर्भातील पाण्याच्या पातळीत होणारी घट आणि त्यातच राहणारी पावसाची अनियमितता यांसारखे अनेक प्रश्न समोर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. यावर तोडगा म्हणून धरण बांधकामाची सुरुवात, कॅनॉल, कालवे इत्यादी कामे त्यांनी प्राधान्याने पूर्णत्वाला नेली. याशिवाय 'पाणी साठवण योजने'यासारख्या योजना राबवल्या. यामुळे पाण्याची अडचण दूर झाली. दादा जितके कठोर, तितकेच मिश्कील होते. फिरक्या घ्यायला ते कमी करत नसत. गोदावरी खोऱ्याच्या पाण्यावरून नगर-नाशिक विरुद्ध मराठवाडा असा संघर्ष सुरू असताना नाशिक-नगरच्या नेत्यांना ते हसत सांगायचे, की मराठवाड्याला पाणी देऊ द्या. तिथे माझी सासुरवाडी आहे. घरच्यांचं मन जपायला तेवढं तरी करू द्या!

महाराष्ट्रातील विविध पाटबंधारे योजनांना गती देताना ठिबक आणि अनेक नव्या तंत्रज्ञानाच्या बीज प्रक्रियांचे निर्णय त्यांनी घेतले. खोरेनिहाय धरण, पाटबंधारे, पाणलोट यासंदर्भात सर्वांगीण विचार करताना दादांनी धडक कामे मार्गी लावली. अजितदादांच्या राजकारणाचा मोठा भाग हा लोकांच्या आयुष्याशी निगडित होता. तिथे इतर नेत्यांसारखा गरळ ओकण्याचा विषय नसतो. दादा नेहमीच महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस एक करत असत. सत्ता असो वा नसो; दादा अविरत काम करत असत, हे महाराष्ट्राला माहीतच आहे. दादा आणि बळीराजा यांच्यामध्ये एक वेगळ्या प्रकारचे नाते होते. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमध्ये बळीराजाला प्रचंड कष्ट सोसावे लागतात. बळीराजाची ही अवस्था पाहून दादा दुष्काळातील जनतेला दिलासा देण्यासाठी उन्हातान्हात फिरत. त्यातून दुष्काळग्रस्त शेतकरी, पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशा फिरणाऱ्या माता-भगिनी, पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे चिंतेत असणारे छोटे कारखानदार यांना दुष्काळाच्या दुष्टचक्रातून निश्चितच काहीसा आश्चर्यकारक दिलासा देणारा निर्णय दादा तळमळीतून घेत. महिला शिकून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्यास कुटुंबाला उभे करते. त्यामुळे महिला सबलीकरण हा विषय अजितदादांच्या अजेंड्यावर होता. महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ५० टक्के राखीव जागांचा निर्णय दादांच्या पुढाकारातून झाला. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा खूप मोठा निर्णय होता.

बळीराजा, महिला, युवक, दलित, आदिवासी यांचा विकास हा दादांच्या राजकारणाचा गाभा होता. दादांनी या उपेक्षित वर्गासाठी घेतलेले निर्णय त्यांना या वर्गाचा तारणहार म्हणून सिद्ध करतात. दादा स्वतः शेतकरीपुत्र होते. त्यांना शेतकऱ्यांचे दुःख समजत होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच आक्रमक भूमिका घेताना दिसले. कर्जमाफी, नुकसानभरपाई, पीक विमा योजना अशा विषयांवर त्यांनी वेळोवेळी सरकारवर दबाव आणला. त्यामुळे ग्रामीण भागात त्यांची कायम लोकप्रियता राहिली. राजकारणात अनेकदा नेते संभ्रमात राहतात; मात्र अजित पवार यांनी नेहमीच स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली. नेतृत्व म्हणजे सर्वांनाच खूश करणे नसते, तर योग्य वाटणारा मार्ग निवडणे असते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले होते. सरकारी फाईलींचा ढीग न करता निर्णय त्वरित घेणे, अधिकाऱ्यांकडून वेळेत काम करून घेणे हा त्यांचा स्वभाव होता. काही वक्तव्ये, काही निर्णय आणि सत्तासंघर्ष यामुळे ते टीकेचे धनी झाले होते; मात्र त्यांनी कधीही टीकेमुळे काम थांबवले नाही. लोकशाहीमध्ये टीका अपरिहार्य असते. त्यातून शिकत पुढे जाणे, हीच परिपक्व नेतृत्वाची खूण असते. अजित पवार यांनी स्वतःला वेळोवेळी बदलत, सुधारत पुढे जाण्याचा प्रयत्न केला होता. मोठ्या पदावर असूनही त्यांनी जनतेशी असलेला संपर्क तुटू दिला नाही. त्यांच्या वाटचालीत चढ-उतार आले, वाद झाले, टीका झाली; पण काम करण्याची जिद्द मात्र कायम राहिली. आजच्या राजकारणात केवळ घोषणांची गर्दी दिसते. प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारे नेते दुर्मीळ होत चालले आहेत. त्यात अजित पवार होते. दुर्दैवाने आज ते आपल्यात नाहीत.

***

# स्मृतींचे राजकारण : शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती सामूहिक स्मृती, मूल्ये आणि परंपरा यांवर उभी असते. एखादा समाज कोणाला स्मरतो, कोणाला विसरतो आणि कोणाला जाणीवपूर्वक बाजूला सारतो, यावर त्या समाजाची वैचारिक दिशा ठरते. याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती-पुण्यतिथी व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती-पुण्यतिथी वगळल्या गेल्याची बाब केवळ प्रशासकीय नव्हे, तर गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. हा निर्णय चुकून झाला आहे का? की तो एका ठराविक विचारसरणीचा सूचक आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नेत्यांना वगळणे हे कुठल्या भारताची कल्पना मांडते?

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज हे केवळ धार्मिक संत नव्हते; ते सामाजिक क्रांतिकारक व महाराष्ट्राच्या आत्म्याचे शिल्पकार होते. त्यांनी समाजाला भक्तीच्या नावाखाली पलायनवाद शिकवला नाही, तर समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी अवघ्या तरुण वयात लिहिलेली ज्ञानेश्वरी ही ग्रंथरचना संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देत मराठीला ज्ञानभाषा बनवणारी ठरली. ''विश्वचि माझे घर'' ही भूमिका मांडणारा हा संत आजही समावेशक भारताची संकल्पना सांगतो. संत तुकाराम महाराजांनी अभंगातून अन्याय, दांभिकता आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. ''जाति कुळ धर्म नाही उरला'' असे सांगणाऱ्या तुकारामांचे विचार आजही समाजातील भिंती तोडणारे आहेत. अशा संतांना शासन निर्णयातून वगळणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मुळांनाच दुय्यम ठरवण्यासारखे आहे. महाराष्ट्राची संतपरंपरा ही कर्मकांडप्रधान नव्हे, तर मानवकेंद्रित परंपरा आहे. संतपरंपरा म्हणजे श्रद्धा नव्हे, तर सामाजिक संविधान आहे. इथे देवापेक्षा माणूस महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर यांनी संतपरंपरेला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानला. अशा परंपरेतील दोन प्रमुख स्तंभ, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची जयंती-पुण्यतिथी शासनाच्या अधिकृत यादीतून वगळली जाणे म्हणजे समतेच्या विचारधारेला बाजूला सारण्याचा संकेत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

दुसरीकडे, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी वगळली जाणेही तितकेच चिंताजनक आहे. राजीव गांधी हे कोणत्याही पक्षापुरते मर्यादित नेते नव्हते; ते आधुनिक भारताच्या तंत्रज्ञानात्मक आणि प्रशासकीय सुधारणांचे शिल्पकार होते. पंचायतराज व्यवस्था, १८ वर्षांवरील मताधिकार, संगणकीकरण, दूरसंचार क्रांती, तरुणांना राजकारणात संधी, या सगळ्या गोष्टींनी भारताला २१व्या शतकात प्रवेश करण्यासाठी तयार केले. आज ''डिजिटल इंडिया''ची भाषा बोलताना, त्याचे मूळ रोवणाऱ्या नेतृत्वाला विसरणे हा इतिहासाशी केलेला अन्याय ठरतो. कोणत्या व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी शासनस्तरावर साजऱ्या करायच्या, हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा नसतो. तो राज्याच्या वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब असतो. त्यामुळेच हा निर्णय ''तांत्रिक'' म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. जर संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीतील नेत्यांना वगळले जात असेल, तर मग कोणत्या मूल्यांना प्राधान्य दिले जात आहे? हा प्रश्न उभा राहतो. शासन हे सर्वसमावेशक असते की निवडक स्मृतींवर उभे राहते, याची चाचणी अशाच निर्णयांतून होते.

इतिहास हा केवळ पुस्तकांत नसतो; तो स्मरणोत्सवांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामूहिक साजरीकरणात जिवंत राहतो. ज्या क्षणी शासन पातळीवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण थांबते, त्या क्षणी हळूहळू तिचे विचारही बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. संत तुकाराम-ज्ञानेश्वर किंवा राजीव गांधी यांना वगळणे म्हणजे फक्त नावांची कपात नव्हे, तर विचारांची कपात आहे. महाराष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक राज्य नव्हे; तो संत-समता-सुधारणांचा प्रदेश आहे. जर याच परंपरेला शासन निर्णयातून दुय्यम स्थान दिले गेले, तर उद्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबाबतही असेच होणार नाही, याची खात्री कोण देणार? हा प्रश्न भावनिक नसून राज्याच्या आत्म्याशी संबंधित आहे.

२०२६ च्या शासन निर्णयाने एक स्पष्ट गरज अधोरेखित केली आहे, इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा समतोल राखणारे निर्णय घेण्याची. कोणालाही वगळून, कुणाला प्राधान्य देऊन समाज एकसंध राहत नाही. संतपरंपरा आणि आधुनिक नेतृत्व हे विरोधी नाहीत; ते एकाच भारतीय प्रवासाचे वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न म्हणजे भारताच्या समावेशक आत्म्यालाच धक्का देणे होय. शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घ्यावा, ही केवळ मागणी नाही; ती लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण राष्ट्र उभे राहते ते केवळ भविष्यातील स्वप्नांवर नाही, तर जपलेल्या स्मृतींवर. महाराष्ट्राची ओळख ही केवळ सत्तेच्या निर्णयांनी घडलेली नाही; ती संतांच्या अभंगांनी, विचारवंतांच्या लेखणीतून आणि राष्ट्रउभारणीत योगदान देणाऱ्या नेत्यांच्या दूरदृष्टीतून घडलेली आहे. त्या स्मृती जपणे ही कोणाची मक्तेदारी नाही, तर शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी शासन निर्णयातून वगळणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, सामूहिक स्मृती पुसण्याचा धोकादायक प्रयत्न ठरू शकतो. आज जर हे स्वीकारले, तर उद्या कोणाचे नाव यादीतून गळेल याची शाश्वती कोण देणार? शासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा. स्मरणोत्सव ही औपचारिकता नाही; ती पिढ्यांना मूल्यांची ओळख करून देणारी शाळा असते. संतांचा विवेक, समाजसुधारकांचा मानवतावाद आणि आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांची दूरदृष्टी, या तिन्ही प्रवाहांशिवाय महाराष्ट्र अपूर्ण आहे. आज गरज आहे ती विभाजनाच्या नव्हे, तर समावेशनाच्या निर्णयांची. सत्तेच्या बदलत्या समीकरणांपेक्षा समाजाच्या दीर्घकालीन आत्म्याला प्राधान्य देण्याची. कारण स्मृती जपणारेच राष्ट्र घडवतात;

आणि स्मृती पुसणारे इतिहासाच्या कठड्यावर उभे राहतात. शासनाने हे लक्षात ठेवावे की, संत, राष्ट्रपुरुष आणि विचारवंत यांना वगळून नव्हे, तर त्यांना सन्मान देऊनच लोकशाही मजबूत होते.

**– प्रवीण बागडे**
नागपूर

****

# शेतात उभे असलेले ट्रॅक्टर केले जप्त

## चोर सोडून संन्यासाला फाशी देण्याचा प्रकार घडल्याने महसूल विभागाच्या विरोधात शेतकऱ्यांचा एल्गार, उपोषण पोलीससह न्यायालयात धाव घेणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर** – माहूर तालुक्यातील अति दुर्गम भागात असलेल्या मौजे अनमाळ येथील शेतकऱ्यांच्या शेतात उभे असलेले ट्रॅक्टर वाळू चोरी करीत असल्याचा संशय घेऊन नायब तहसीलदार कैलास जेठे आणि तलाठी चंद्रकांत बाबर यांनी जप्त करून माहूरच्या तहसील कार्यालयात दि २ रोजीआणून जप्त केल्याने चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचा प्रकार घडल्याने महसूल विभागाच्या विरोधात तीव्र असंतोष पसरला आहे

माहूर शहरात वाळूची गरज पाहता वाळू तस्करांनी अक्षरश उच्छाद मांडला असून नको त्या ठिकाणची वाळू भरमसाठ दर आकारून रात्रंदिवस टाकण्यात येत आहे माहूर सह तालुका भरात प्रत्येक गल्लीबोळात वाळूचे ढिगारे दिसत असून अनेक ठिकाणी बॉडीगार्ड बाऊन्सर च्या साह्याने वाळू चोरून नेणाऱ्या वाहनाला सुरक्षा देत वाळू टाकण्यात येत असून वीस हजार रुपये प्रति तीन बरास साठी आकारण्यात येत असूनही नागरिकांची मजबुरी असल्याने नागरिक ही माहागची वाळू घेत आहेत सदरील प्रकार माहूरच्या महसूल कार्यालयाला दिसत नसल्याने नागरिक अचंबित होत आहेत तर नायब तहसीलदार कैलास जेठे आणि चंद्रकांत बाबर तलाठी हे नको त्या ठिकाणी जाऊन घरात उभे असलेले ट्रॅक्टर जबरदस्तीने माहूरच्या तहसील कार्यालयात आणून लावत असल्याच्या घटना या आधी घडलेल्या असून अनेकांनी तसे अर्जही दिलेले आहेत







दि २ रोजी मौजे अनमाळ येथील सय्यद सलीम सय्यद फरीद यांचे ट्रॅक्टर शेतात लावलेले असताना कुठलीही विचारपूस न करता पोलीस पाटील कोतवालांच्या सहाय्याने ट्रॅक्टरची चावी नसतानाही वायरची जोडतोड करून ट्रॅक्टर चालू करून मुख्य रस्त्यावर आणले तसेच येथील खूपसे यांचे नवीन ट्रॅक्टर पासिंगची टेक्निकल प्रॉब्लेम असल्याने त्यांनी ते ट्रॅक्टर शेतात लावून ठेवले होते तेही ट्रॅक्टर त्यांनी चालू करून रस्त्यावर आणले असता येथील नागरिकांनी त्यांना मज्जाव केला तर त्यांना तुमच्यावर सरकारी कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात येईल अशी धमकी देऊन दोन्ही ट्रॅक्टर माहूरच्या तहसील कार्यालयात आणून लावले त्यामुळे सदरील शेतकऱ्यातून संतप्त प्रतिक्रिया उमटत असून ट्रॅक्टर तत्काळ सोडावे अन्यथा आमरण उपोषण पोलीसासह न्यायालयात धाव घेणार असल्याचे त्यांनी अर्जात नमूद केले असून वेळप्रसंगी उपासमारीची बेरोजगारीची पाळी आल्यास आत्मदहन ही करणार असल्याचे सांगितले आहे. सदरील घटनेमुळे माहूर तालुक्यातील ट्रॅक्टर चालक शेतकऱ्यात घबराट पसरली असून अवैध वाळू चोरीचे व्यवसाय करणाऱ्यांना सूट आणि अवैध व्यवसाय न करणाऱ्यांचे ट्रॅक्टर जप्त होत असल्याची मोठी चर्चा माहूर तालुक्यात सुरू झाल्याने महसूल विभागाच्या चोर सोडून सन्यासाला फाशी देत असल्याच्या प्रकारामुळे ट्रॅक्टर मालक शेतकऱ्यात घबराट पसरली असून कुठलीही चौकशी न करणारे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांनी या प्रकाराची चौकशी करून जप्त केलेले ट्रॅक्टर सोडण्याचे आदेश द्यावे अशी अपेक्षा ट्रॅक्टर मालक यांनी व्यक्त केली आहे.



# मांडवी ग्रामपंचायतीची आमसभा उत्साहात संपन्न; विकासकामे मार्गी लावण्याचे सरपंचांचे आश्वासन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मांडवी** – मांडवी ग्रामपंचायतीची आमसभा सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात सुमनबाई पेंदोर यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या आमसभेत ग्रामविकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सभेत रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा, वीज समस्या, सार्वजनिक बांधकामे, तसेच महिलां–युवकांसाठीच्या विकास योजनांबाबत नागरिकांनी आपली मते मांडली. ग्रामस्थांनी मांडलेल्या समस्यांची नोंद घेत सरपंच सुमनबाई पेंदोर यांनी संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे ठाम आश्वासन दिले.

यावेळी मांडवी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील आगामी विकास आराखडा, निधी उपलब्धता आणि कामांच्या प्राधान्यक्रमावरही चर्चा झाली. पारदर्शक प्रशासन, वेळेत कामांची अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सहभागातून गावाचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्लजी राठोड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी ग्रामविकासासाठी शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन करत ग्रामपंचायतीला आवश्यक ते सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. आमसभेला ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी–कर्मचारी तसेच शेकडो प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सकारात्मक चर्चेमुळे सभा यशस्वी ठरली.

# मांडवी–किनवट परिसरात बिबट्याचा वावर; नागरिकांत दहशत

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – मांडवी ते किनवट रस्त्यावरील सरस विद्यालयाच्या पाठीमागील शेतामध्ये वन विभागाच्या पाहणीत बिबट्याच्या पायांचे ठसे आढळून आले. त्यामुळे नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष शिरसेटवार यांनी केले आहे.



किनवट व आदिलाबादकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सरस विद्यालयाच्या पाठीमागे प्रियांका राठोड यांचे सर्व्हे नंबर १०५ मधील शेतात मजुरांना पिकांची नासधूस झाल्याचे दिसून आल्यानंतर त्यांनी पाहणी केली असता तेथे जनावरांच्या पायांचे ठसे आढळून आले. ही माहिती त्यांनी शेतमालक प्रबोध राठोड यांना दिली. त्यानंतर राठोड यांनी मांडवीच्या वनपरिक्षेत्र कार्यालयाला माहिती दिली. वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष शिरसेटवार यांच्या मार्गदर्शनात वनपाल नीलेश तायडे, वनरक्षक माधव रायमले, यू.जी. सोनटक्के यांनी परिसरात पाहणी केली असता बिबट्याच्या पायांचे ठसे आढळून आले. संबंधित परिसरात ट्रॅप कॅमेरे बसविण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली.

(एकट्याने शेतात जाणे टाळावे)

आदिलाबाद (तेलंगणा) कडे जाणारा मांडवी ते किनवट हा रस्ता रहदारीचा आहे. या मार्गावर सरस विद्यालय तसेच खान अब्दुल गफार खान नेत्र रुग्णालय आहे. त्यामुळे या घटनेमुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात किंवा निर्जन ठिकाणी जाणे टाळावे, आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

# मधाचेगाव भंडारवाडी येथे सामूहिक सुविधा केंद्र व माहिती दालनाचे भूमिपूजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – मधाचेगाव म्हणून निवड झालेल्या भंडारवाडी येथे महाराष्ट्र राज्य खादी व ग्राम उद्योग मंडळाच्या वतीने सामूहिक सुविधा केंद्र व माहिती दालन बांधकामाचा भूमिपूजन सोहळा तसेच मधपाळ प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.






हा भूमिपूजन सोहळा महाराष्ट्र राज्य खादी व ग्राम उद्योग मंडळाचे सभापती श्री. रवींद्रजी साठे व महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग, मुंबईचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नित्यानंद पाटील यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी सरपंच अभिमन्यू गादेवाड, उपसरपंच अमर केंद्रे, जिल्हा ग्राम उद्योग अधिकारी संनय सारंगधर खादी ग्राम उद्योगचे एडिटर राज गुंजकर निरीक्षक ज्ञानेश्वर राऊतराव पर्यवेक्षक रमेश यादव,डॉक्टर उत्तम धुमाळे,प्रकाश टारपे, ज्ञानेश्वर जेवलेवाड,संतोष पवार,परशुराम केंद्रे, पत्रकार गंगाराम गडमवाड,गौतम कांबळे,अशोक केंद्रे, गजानन डवरे,रामकिशन टारपे, संतोष गोपेवाड ग्रामसेविका प्रियंका डुडूळे, राजू कांबळे यांच्यासह खादी ग्राम उद्योगचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील यांनी मधमाशी पालन, मध संकलन, मधाची प्रक्रिया व विक्री याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मधमाशी पालनातून ग्रामीण भागातील तरुणांसाठी शाश्वत रोजगारनिर्मिती शक्य असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

तर सभापती रवींद्रजी साठे यांनी मधाचेगाव या संकल्पनेविषयी माहिती देत, भंडारवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या सामूहिक सुविधा केंद्र व माहिती दालनातून पर्यटनाला चालना मिळेल तसेच स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाला गावातील नागरिक, तरुण वर्ग व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नांदेड उदगीर मध्ये जुगार अड्या वर धाड, उदगीर मध्ये जुगार अड्या वर धाड एक गावठी पिस्तूल ८ लाख ६८ हजाराचा मुद्देमाल जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड** – परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या विशेष पथकाने लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि नांदेड शहरातील इतवारा भागात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई केली आहे. या मोहिमेत पोलिसांनी रोख रकमेसह, मोबाईल आणि एक गावठी पिस्तुल असा एकूण ८ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून अनेक आरोपींना ताब्यात घेतले आहे.

दि.२७ जानेवारी रोजी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाईक चौकात रमेश गिरी याच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १ लाख ५ हजार २०० रुपये रोख आणि ७० हजार रुपयांचे १२ मोबाईल जप्त करण्यात आले. या प्रकरणी १३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासोबतच ३० जानेवारी रोजी नांदेडमधील मच्छी मार्केट परिसरातील जुगार अड्ड्यावर पथकाने छापा टाकला. तेथे जुगार खेळणाऱ्या २५ व्यक्तींकडून २ लाख ३४ हजार १०० रुपये रोख आणि ४ लाख २८ हजार रुपयांचे २७ मोबाईल जप्त केले.

इतवारा हद्दीतच जयकिशन ऊर्फ जय राजेशसिंह ठाकूर (वय २१ वर्ष, रा. उल्हासनगर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ३१ हजार ५०० रुपये किमतीचे एक गावठी पिस्तुल आणि ३ जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले असून त्याच्यावर शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान,या दोन्ही ठिकाणच्या कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण ३ लाख ४० हजार रुपये रोख रक्कम, ५ लाख रुपये किमतीचे ३९ मोबाईल, १ गावठी पिस्तुल व ३ जिवंत काडतूस, ज्याची एकूण किंमत ८ लाख ६८ हजार ८०० रुपये इतकी आहे. सदर कारवाई सहायक पोलीस निरीक्षक



श्रीराम माचेवाड व त्यांच्या पथकातील अंमलदार प्रदिप खानसोळे, संजीव जिंकलवाड,गणेश धुमाळ, कामाजी गवळी आणि विलास सुरवसे यांनी यशस्वी केली. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकास १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास किंवा ‘खबर’ हेल्पलाइन क्रमांक ९१ ५० १०० १०० वर कळवावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ : नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहावे

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी** –निवडणूक मतदान कार्यासाठी विशेष प्रशिक्षण दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी गायत्री लॉन्स, एम.आय.डी.सी., जिंतूर येथे सकाळी ९.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे. यासाठी पहिल्या व दुसऱ्या प्रशिक्षणात अनुपस्थित राहिलेले तसेच नव्याने नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी प्रशिक्षणासाठी उपस्थित राहावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी जिंतूर यांनी केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा सुधारीत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना दि. ३१ जानेवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून मतदान दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शनिवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. तर मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सोमवार सकाळी १०.०० वाजता सुरू होणार असून निवडून आलेल्या सदस्यांची नावे दि. ११ फेब्रुवारी २०२६ (बुधवार) पर्यंत शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार मतदान ७ फेब्रुवारी, २०२६ रोजी असल्याने मतदानाच्या दिवशी नियुक्त केलेल्या शिक्षकांची केंद्रीय अभियोग्यता परीक्षा असल्यामुळे मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली आहे. त्यामुळे परीक्षा व आपत्कालीन वैद्यकीय कारणे वगळता कोणत्याही कर्मचाऱ्यास निवडणूक कर्तव्यातून सूट देण्यात येणार नाही. गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तसेच मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे मतदान अधिकारी १,२,३ यांना केंद्राध्यक्ष म्हणून काम करावे लागू शकते यासाठी सर्व नियुक्त कर्मचारी यांनी गांभीर्याने प्रशिक्षण घ्यावे.

# नांदेड महापालिकेकडून थकीत कर वसुलीसाठी जप्ती मोहीम सुरु; अशोक नगरमध्ये २ दुकाने सील

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुलीसाठी आक्रमक भूमिका घेत थकबाकीदारांविरोधात व्यापक जप्ती मोहीम सुरू केली आहे. महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष वसुली व जप्ती पथकांची स्थापना करण्यात आली असून, शहरातील सहा क्षेत्रीय कार्यालयांमार्फत कारवाईचा धडाका लावण्यात आला आहे.

महापालिकेने चालू आर्थिक वर्षासाठी १५१ कोटी रुपयांचे वसुली उद्दिष्ट निश्चित केले होते. मात्र, जानेवारी अखेरपर्यंत केवळ ४३ कोटी रुपयेच वसूल झाल्याने प्रशासनाने कठोर निर्णय घेतले आहेत. उद्दिष्ट गाठण्यासाठी आता थकबाकीदारांवर थेट जप्ती, सीलिंग आणि नाव जाहीर करण्याची रणनीती अमलात आणली जात आहे.

### दोन व्यावसायिक दुकाने सील

२ फेब्रुवारी रोजी अशोक नगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत हनुमानगड परिसरात सरोजा नागनाथ सुन्नेवार आणि विमल नागनाथ सुन्नेवार यांच्या मालमत्तांवर कारवाई करण्यात आली. या मालमत्ताधारकांकडे १.०६ लाख रुपयांची थकबाकी असल्याने त्यांच्या दोन व्यावसायिक दुकाने सील करण्यात आली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, इतर थकबाकीदारांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### विशेष पथकांची तैनाती

अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम आणि निलेश सुंकेवार यांच्या नियंत्रणाखाली सहा क्षेत्रीय कार्यालयांत ८ ते ९ कर्मचाऱ्यांची स्वतंत्र पथके कार्यरत आहेत. ही पथके दररोज थकबाकीदारांची तपासणी, नोटिसा, प्रत्यक्ष जप्ती व सीलिंगची कारवाई करत आहेत. आवश्यक तेथे पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात येत आहे.

### थकबाकीदारांची नावे होणार जाहीर

महापालिकेने स्पष्ट इशारा दिला आहे की, ज्यांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, अशा सर्व थकबाकीदारांची नावे सार्वजनिकरित्या जाहीर करण्यात येणार आहेत. नाव जाहीर झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार, सवलत किंवा मुदतवाढ दिली जाणार नाही. ‘‘कर न भरणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई अपरिहार्य आहे,’’ असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### नागरिकांना आवाहन

दरम्यान, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन केले असून, स्वयंस्फूर्तपणे थकबाकी भरल्यास जप्ती व सीलिंगसारख्या कारवाया टाळता येतील, असे नमूद केले आहे. एकंदरीत, महापालिकेच्या या कठोर भूमिकेमुळे आगामी काळात वसुलीत वाढ होण्याची शक्यता असून, शहरातील कर शिस्त अधिक कडक होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



# उमरी तालुक्यात अवैध वाळू विक्री व साठवण्यासाठी, माफियांचा 'रात्रीस खेळ चाले?

## एकावरही कारवाई नाही प्रशासन मिलीभगत झाल्याचं चित्र!!

**आत्ताच एक्सप्रेस**

**उमरी –** उमरी तहसीलपासुन अंतरावर वाळू माफियांकडून मागील अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू साठा व लाखो ब्रास वाळू विक्री करण्यात येत आहे. मात्र, वाळू माफियांच्या अवैध वाहतूक वाळू साठ्यांकडे उमरी महसूल विभाग जाणुन बुजुन दुर्लक्ष करत असल्यामुळे बळेगाव, कौडगाव,महाटी,येळी, इज्जतगाव मनुर परिसरात राजरोसपणे मोठ्या प्रमाणात रात्रदिवस अवैध वाळू साठा सुरू आहे. उल्लेखनीय बाब अशी की, हा वाळू साठा करण्यापूर्वी वाळू धुण्याचे काम लगतच्या बळेगाव कौडगाव महाटी परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रावर दिवसा केले जाते. महसूल विभागाच्या 'हितसंबंधामुळे' हा सर्व प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून राजरोसपणे सुरू असल्याची चर्चा करित आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने वाळू वाहतूक वाळू साठ्याचा गोरखधंदा उमरी परिसरात सध्या फोफावताना दिसत आहे.

गोदावरी नदी परिसराला लागून असणाऱ्या महाटी येळी इज्जतगाव मनुर कौडगाव आटाळा,आदी ठिकाणाहून दररोज अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणावर राजरोस चोरटी वाहतूक करण्यात येत आहे. या चोरट्या वाहतुकीकडे संबंधित महसूल विभाग, वाहतूक स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे माफियांचे फावत आहे. परिणामी शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवून नुकसान होत आहे. याच अवैध वाहनांच्या सुसाट वेगामुळे अनेकांना आपले प्राणही गमावावे लागले आहेत. विनाक्रमांक धावणाऱ्या हायवा ट्रकमधून ही चोरटी वाळू वाहतूक सुरू आहे. माफियांच्या वाढत्या दहशतीमुळे तसेच प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या 'मधुर संबंधामुळे' सर्वकाही सुरळीत सुरू असल्याची खंत परिसरातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.

रात्रीस खेळ चाले..... : सध्यावाळूपट्ट्यांचे लिलाव लालफितीत अडकल्यामुळे मागणीच्या तुलनेत वाळू उपलब्ध होत नाही. परिणामी वाळूचे भाव वाढले आहेत. याच संधीचा फायदा घेत वाळू माफिया प्रशासकीय कर्मचारी-अधिकारी तसेच बलाढ्य पुढाऱ्यांना हाताशी धरून वाळू साठा व विक्री करत मागणीनुसार वाळू विक्रीचा गोरखधंदा करत आहेत. त्यासाठी या माफियांनी रात्रीची वेळ निवडली आहे. रात्री उशिराने सुरू होणारा हा प्रवास पहाटेपर्यंत चालतो. त्यानंतर दिवसभरात लगतच्या गोदावरी नदीवर वाळू धुऊन स्वच्छ करण्याचे काम चालते. मात्र, इतर मंडळी (प्रशासकीय) जरी या प्रकरणांपासून 'अनभिज्ञ' असली तरी स्थानिक रहिवासी मात्र नक्कीच या प्रकरणापासून अनभिज्ञ नाहीत. नागरिकांनी या प्रकरणाला वाचा



फोडण्यासाठी माध्यमांकडे धाव घेऊन हे प्रकरण प्रकाशझोतात घेऊन येण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र, माफियांचा प्रशासनाचा ससेमिरा नको म्हणून त्यांनी नाव छापण्यास असमर्थता दाखवली. परिसरातील अनेक नागरिकांच्या मोबाइलमध्ये अवैध वाळू माफियांच्या गोरखधंद्याचे चित्रीकरण छायाचित्रे उपलब्ध असल्याचे नागरिक सांगतात.

तरीही यांवर कार्यवाही मात्र होतं नाही उमरी तालुका प्रशासनान मिलीभगत झाल्याचं चित्र दिसून येत आहे.

## शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबीराचे गंगाखेडाला १४ फेब्रुवारी रोजी आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिति ,गंगाखेड तसेच जिल्हा प्रशासन यांच्यावतीने दि. १४ फेब्रुवारी, रोजी सकाळी ११ वाजता कापसे मंगल कार्यालय परळी रोड, गंगाखेड येथे विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या महावेळाव्याचा मुख्य विषय ''ज्येष्ठ नागरिकंसाठीच्या योजना व वैद्यकीय तपासणी'' असून त्या व्यतिरिक्त समाजातील दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबतही माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायमुर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायाधीश, परभणी जिल्हा यांच्या हस्ते महाशिबीराचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नितीशा माथुर याच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भुषण काळे आणि गंगाखेड वकील संघाचे अध्यक्ष मिलिंद क्षिरसागर यांनी केले आहे.

## उमरी खाद्यतेलाला महागाईचा तडका; शेंगदाणा तेल २०० रुपये किलोवर?

### सततच्या वाढत्या महागाईने गृहिणींना बजेट कोलमडले!

**आत्ताच एक्सप्रेस**



**उमरी –** अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले असून आता सोयाबीनच्या दरात झालेली वाढ ही खाद्यतेलावर २० टक्के इकतकी वाढत्या किमती यांचा एकत्रित परिणाम बाजारात दिसून येत आहे. बऱ्याच दिवसांपासून स्थिर असलेले खाद्यतेलाचे भाव अचानक वाढल्याने गृहिणींच्या स्वयंपाकघराचा अर्थसंकल्प बिघडला आहे.

सण-उत्सव नसतानाही झालेली ही दरवाढ सर्वसामान्यांच्या खिशाला चटका देणारी ठरत आहे, शेंगदाणा तेलाच्या दरात सर्वाधिक वाढ नोंदवली गेली आहे. शेंगदाणा तेल २०० रूपये किलोवर पोहोचले आहे. शेंगदाणा तेलासोबत बाजारात इतरही तेलाचे भाव वाढले आहेत. वाढत्या महागाईसोबत आता सर्वसामान्यांना वाढलेल्या तेलाच्या भाताचीही झळ सोसावी लागत आहे. तेलाच्या दरात झालेल्या भाववाढीमूळे गृहिणीची स्वयंपाक घरातील हात आवरता घेतला आहे. त्यामुळे स्वयंपाक घरात तेलाच्या पदार्थांवर सध्यातरी काही प्रमाणात बंदी घालण्यात आल्याचे दिसून येत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून खाद्यतेलाचे दर जवळपास स्थिर होते. मात्र, जानेवारीपासून अचानक दरवाढी सुरू झाला असून ही वाढ टप्प्याटप्याने होत आहे. खाद्यतेलाची अचानक दरवाढ झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक झळ सोसावी लागत आह

अतिवृष्टीमुळे सोयाबीन व शेंगदाण्याचे उत्पादन घटले, सोयाबीनच्या हमीभावात वाढ, खाद्यतेलावर २० टक्के आयात शुल्क, डॉलर महागल्याने आयात खर्च वाढला, जागतिक बाजारातील अस्थिरता आदी कारणे दिसून येत आहेत. तेलाचे भाव अचानक वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांना याचा फटका सहन करावा लागत आहे.

सणासुदीच्या काळात खाद्यतलाच्या दरात वाढत हीत मात्र यंदा कोणताही मोठा सण झाली आहे. किरकोळ बाजारात दर आठवड्याला दरवाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळेच नागरिकांना याचा फटका बसत आहे.

सध्या खाद्यतेलाचे भाव गगनाला गेले असून महागाईमुळे लाडक्या बहिणींनी करावे तरी काय, असा प्रश्न आहे. एका बाजूने दिल्याचा दिखावा करायचा, अन् दुसऱ्या बाजूने दुपट्टीने काढायचे, असे शासनाचे धोरण दिसून येत आहे.

## प्रजासत्ताक सांस्कृतिक महोत्सवाने गावकऱ्यांची जिंकली मने

### वंसुधरा कदम हिच्या मला जगायचं एकपात्रीने मिळवली वाहवा !

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** शनिवारपेठ केंद्रांतर्गत जिल्हा परिषद दरसांगवी (चि.) शाळेच्या विद्यार्थ्यांची प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध कलागुण दर्शनाने गावकऱ्यांचे मने जिंकली. हनुमान मंदिराच्या सभा मंडपात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा जिजाबाई श्रीहरी शेलार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पुष्प पूजनानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी इयत्ता सातवीची विद्यार्थिनी कु. वसुंधरा संजय कदम हिने स्त्रीभ्रूणहत्या विषयावर आधारित मला जगायचं.. ही एकपात्री सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

कार्यक्रमाची सुरुवात संगीत विशारद शिक्षिका अर्चना भंडारवार यांच्या स्वागत गीताने झाली. हीच आमची प्रार्थना अन हेच आमचे मागणे माणसाने माणसासाठी माणसासम वागणे.. या गीताच्या गायनानंतर गवळण नृत्य, देश रंगीला, ललाटी भंडार जोगवा नृत्य, माऊली माऊली, माझ्या मनामध्ये तणामध्ये शिवबाचं नाव रं.. फुले सावित्री नसती तर




मुलगी शिकली असती का.. झुलवा पाळणा बाळ शिवबाचा, सुटा बुटात शोभून दिसतोय ग माझा भिमराव आंबेडकर.. नांदण नांदण माझ्या रमाचं नांदण, कॉमेडीशो रिमिक्स डान्स, चांदवाला मुखडा, वाया वाया पोया पोया.. नन्ना रे नन्ना रे रिमिक्स, कू कुकू रिमिक्स.. अशा अनेक गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्यकला सादर करून प्रेक्षकांच्या टाळ्या मिळविल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश मुनेश्वर यांनी केले. सूत्रसंचालन पदविधर शिक्षक प्रल्हाद गित्ते यांनी तर आभार उपक्रमशील शिक्षक मनोहर खोकले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीहरी शेलार, संजय कदम, बंडू चव्हाण, देवराव हातमोडे, परमेश्वर कदम, उमाकांत शेलार, अरविंद कदम, ओमप्रकाश नरवाडे, जयवंत दिवठाणकर, गंगाधर मिरासे, अभिमन्यू चव्हाण, अंगणवाडी सेविका विद्या कावळे, अर्चना पिलवंड, पंचफुलाबाई पवार आदिने परिश्रम घेतले.

सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी पृथ्वी कदम, सोनाली चव्हाण, प्रियल वाठोरे, वेदिका चव्हाण, वसुंधरा कदम, ज्ञानेश्वरी शेलार, दुर्गा पवार, अक्षरा ठाकूर, श्रावणी बोरकर, श्रेयानी शेळके, आराध्या कदम, समृद्धी बोरुळकर, अक्षरा कदम, नंदनी दिवठाणकर, मानवी मनमंदे, शिव मिराशे, श्रीनिधी मिराशे, त्रिशा बिजोरे, राजरतन वाठोरे, साईनाथ बोरकर, अभय कदम, जय तरटे, मोक्ष तरटे, विराट जगताप, बालाजी तरटे, श्रद्धा शेलार, कल्याणी लांबाटे, मोनिका जाधव, जय बिजोरे, अर्जुन लांडगे, नंदनी दिवठाणकर, रुद्र चिकटवाड, नरहरी चव्हाण, गजानन शेलार, श्वेता पवार, पायल तालमवाड, प्राची चव्हाण, सानिध्या नरवाडे, शिवकन्या ढवळे, समीक्षा भालेराव, नंदनी बोरकर, आचल ठाकूर, चैत्रा पेंटेवार, सिया इंगोले, लावण्या वानखेडे, प्राजक्ता कामारकर, सोहम नरवाडे, दुर्गा चव्हाण, सलोनी रणवीर, आरती पुंजरवाड, दिपाली चव्हाण, किरण चव्हाण, समाधान वाठोरे, गणेश जाधव आदिनी उस्फुर्त सहभाग घेतला होता.




## हुतात्मा दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात मौन पाळून आदरांजली

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आज जिल्हाधिकारी कार्यालयात दोन मिनीटे मौन पाळून आदरांजली वाहण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते ११ वा. २ मि. या कालावधीत उपस्थित सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नायबतहसिलदार प्रशांत वाकोडकर, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## केटीसी ट्रकची मोटरसायकलला धडक, मोटर सायकलस्वार दोन्ही भावंडांचे पाय मोडले

### माहूर घाटात मोटरसायकलला धडक देऊन ट्रक पसार

**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्यातील मौजे आष्टा येथून दोन सख्खे भाऊ मोटर सायकलद्वारे माहूर शहरात बाजारासाठी येत असताना मालवाडा घाटातील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर मोटर सायकल स्वार दोन्ही भावंडांना केटीसी लिहिलेल्या मोठ्या ट्रकने धडक देऊन दोघांना गंभीर जखमी करत पसार झाल्याची घटना दि २ रोजी १२ वाजता घडल्याने जखमींना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्याची घटना घडली आहे

मौजे आष्टा येथून सोमवारी बाजारचा दिवस असल्याने शाईन मोटरसायकल क्रमांक २० ९८०९ वरुन गणेश भाऊसिंग राठोड वय ५० अणि रमेश भाऊसिंग राठोड वय ४५ दोघे राहणार कसळसिंग तांडा माहूर कडे येत होते मालवाडा घाटातील अतिशय गंभीर असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालया समोरील घातक वळणावरून दोघे येत असताना माहूर वरून आदिलाबाद कडे जाणाऱ्या केटीसी ट्रक भरधाव वेगात आल्याने मोटरसायकलला त्याचा धक्का बसल्याने दोघेजण अर्धवट असलेल्या रस्त्यावरील गीट्टीवर आढळले त्यामुळे दोघांचे उजवे पाय पोटरी जवळ मोडले व छातीला डोक्याला गंभीर मार लागला उपस्थितांनि त्यांना जवळच असलेल्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले यावेळी केटीसी कंपनीच्या ट्रकच्या स्पीडला ब्रेक लावावा अशी मागणी उपस्थित नागरिकांनी पोलिसांना केली रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ ओमप्रकाश साबळे यांनी प्रथमोपचार करून १०८ ॲम्बुलन्स चे चालक आसिफ बेग यांचे देखरेखित यवतमाळ येथे पुढील उपचारासाठी पाठवले. मालवाडा घाटात अर्ध्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून वन विभागाच्या अडचणीमुळे अर्ध्या रस्त्याचे काम एका बाजूने झाले परंतु दुसरी बाजू अर्धवट ठेवल्याने या ठिकाणी रहदारीस प्रचंड अडथळे येत दररोज अपघात घडत आहेत त्यामुळे सदरील रस्त्याचे काम तात्काळ निकाली काढण्याची मागणी वाहनधारकातून होत असून ट्रॉमा केअर सेंटर असते तर येथेच त्यांचा उपचार झाला असता अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थितातून येत होती





## टोयोटा किर्लोस्कर मोटरने जानेवारी २०२६ मध्ये ३३,८८० युनिट्सची विक्री नोंदवली

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज जानेवारी २०२६ महिन्याच्या विक्री कामगिरीची घोषणा केली. कंपनीने जानेवारी २०२५ मध्ये विक्री झालेल्या २९,३७१ युनिट्सच्या तुलनेत जानेवारी २०२६ मध्ये एकूण ३३,८८० युनिट्सची विक्री नोंदवली. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत ३०,६३० युनिट्सची विक्री झाली असून ३,२५० युनिट्सची निर्यात करण्यात आली. हे प्रमुख मॉडेल्ससाठी सातत्यपूर्ण ग्राहक मागणी आणि विश्वसनीय व मूल्याधारित मोबिलिटी सोल्यूशन्स देण्याच्या टीकेएम च्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

विक्री कामगिरीबाबत भाष्य करताना टोयोटा किर्लोस्कर मोटरचे सेल्स-सर्व्हिस-यूज्ड कार बिझनेसचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट श्री. साबरी मनोहर म्हणाले, ''२०२६ वर्षाची सुरुवात सकारात्मक आणि उत्साहवर्धक झाली आहे. आमच्या उत्पादन पोर्टफोलिओला मिळत असलेली सातत्यपूर्ण गती आणि गुणवत्ता, सुरक्षितता व शाश्वततेबाबत आमच्या वचनबद्धतेवर ग्राहकांचा असलेला विश्वास हे यामागील प्रमुख कारण आहे. जानेवारी महिन्यातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला चे लॉंचिंग, ज्यामुळे भविष्यासाठी सज्ज मोबिलिटी सोल्यूशन्स देण्याच्या आमच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे.

## भरत गीते मराठी उद्योजकांचा अभिमान

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** ''जागतिक आर्थिक परिषदेत (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) गेल्या वर्षी करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराची 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे उद्योजक भरत गीते यांनी अवघ्या एका वर्षात यशस्वी अंमलबजावणी करून प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे. वर्षभरात उद्योग उभारणी करणाऱ्या गीते यांच्यासारख्या मराठी उद्योजकांचा मला अभिमान वाटतो,'' असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

## सुरक्षित भारत, स्वस्थ भारत, वेदनामुक्त भारत' उपक्रमांतर्गत आर्मी सीएचएस, नेरुळ व वाशी पोलीस ठाण्यात विशेष आरोग्य जनजागृती उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी मुंबई –** देशाच्या सुरक्षेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या भारतीय लष्कर व पोलीस दलाच्या जवानांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने पारसनाथ स्पेशालिटी क्लिनिक यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर विशेष आरोग्य जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाची संकल्पना होती ''सुरक्षित भारत, स्वस्थ भारत, वेदनामुक्त भारत.'' या उपक्रमांतर्गत आर्मी सीएचएस, नेरुळ येथे लष्करातील अधिकारी, जवान व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विशेष आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये गुडघेदुखी, पाठदुखी व मणक्याच्या वेदनांवर शस्त्रक्रियेविना आयुर्वेदाधारित उपचारपद्धती कशा प्रकारे परिणामकारक ठरू शकतात, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

पारसनाथ स्पेशालिटी क्लिनिकच्या एसआरडीपी थेरपीमुळे आजवर लाखो रुग्णांना शस्त्रक्रिया टाळता आल्याचे प्रत्यक्ष अनुभव यावेळी सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले पहिल्या रुग्णाच्या एक्स-रे रिव्हर्सल यशोगाथेचे सादरीकरण, ज्यामुळे उपस्थितांमध्ये उपचारांबाबत विश्वास आणि सकारात्मकता निर्माण झाली.

याच उपक्रमाचा भाग म्हणून वाशी पोलीस ठाणे येथेही विशेष भेट देण्यात आली.पारसनाथ स्पेशालिटी क्लिनिकचे संस्थापक डॉ. भालचंद्र महामुनी (संस्थापक एमडी आयुर्वेद) यांनी आपल्या टीमसह वाशी पोलीस ठाण्यास भेट देऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावासाठी पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813